**ठळक बातम्या**

- भारत इराणसह इतर चाळीस देशांमधून कच्च्या तेलाची आयात करत असून या खरेदीत देयकांची समस्या नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्र्यांचं स्पष्टीकरण

- होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी अमेरिकेचा इराणला ४८ तासांचा अंतिम इशारा

- आखातातल्या युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर ८ दशांश टक्के कमी होईल असा मूडीजचा अंदाज

- ईस्टरचा सण सर्वत्र भक्तिभावाने साजरा

**आणि**

- पॅरा जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारताला ७ सुवर्णपदकांचा लाभ

**<><><><><>**

भारत इराणसह इतर चाळीस देशांमधून कच्च्या तेलांची आयात करत असून या खरेदीत देयकांची समस्या नसल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदिप सिंग पुरी यांनी म्हटलं आहे. समाजमाध्यमावर देयकांची समस्या निर्माण झाल्यानं भारताच्या वाडीनार इथं येणारं इराणच्या कच्च्या तेलाचं एक जहाज चीनकडे वळवण्यात आल्याचं वृत्त समाजमाध्यमावर प्रसिद्ध झालं होतं. त्याचा समाचार घेताना पुरी यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, हे वृत्त चुकीचं आहे. पश्चिम आशियामधल्या युद्ध स्थितीमध्येही भारतीय तेलशुद्धीकरण प्रकल्पांना लागणाऱ्या कच्च्या तेलाचा पुरवठा विविध देशांमधून सुरळीतपणे होत आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ४८ तासांचा अंतिम इशारा दिला आहे. इराणकडे यासाठी आता केवळ ४८ तासांचा अवधी असून त्यानंतर त्यांना गंभीर परिणामांना तोंड द्यावं लागेलं असं ट्रंप यांनी समाजमाध्यमावर एका संदेशात म्हटलं आहे. अमेरिकेनं युद्ध समाप्तीसाठी धोरणात्मक चर्चेच्या मुद्याचा

पुनरुच्चार केला आहे. इराणने मात्र संघर्ष समाप्त करण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव एकतर्फी असल्याचं सांगत नकार दिला आहे.

<><><><><>

संघर्षग्रस्त इराणमध्ये अडकलेल्या एकंदर ३४५ भारतीय मच्छीमारांना काल संध्याकाळी  आर्मेनिया मार्गे सुरक्षितपणे चेन्नईमध्ये आणण्यात आलं.

हे अभियान, संघर्षग्रस्त भागातल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भारताच्या सातत्य पूर्ण प्रयत्नांचा भाग असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांच्या परतीसाठी आर्मेनिया सतत सहकार्य करत असून त्यांच्या या सहकार्यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आर्मेनिया सरकारचे आभार मानले आहेत. ईराणमधून एकंदर बाराशे पेक्षा अधिक भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे स्थलांतरित करण्यात आलं असून त्यापैकी ९९६ जण आर्मेनियात पोहोचले असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली.

<><><><><>

मूडीज या पतमानांकन संस्थेनं चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वृद्धी दराचा अंदाज ६ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांवरुन कमी करुन ६ टक्के पर्यंत आणला आहे. पश्चिम आशियात सध्या सुरु असलेल्या संघर्षामुळे आर्थिक वृद्धीची गती मंदावेल आणि महागाईत वाढ होईल, असा अंदाज मूडीजनं वर्तवला आहे. या युद्धामुळे एलपीजीच्या पुरवठ्यात घट होऊन नजीकच्या काळात घरगुती पातळीवर त्याचा तुटवडा होईल, इंधनाच्या किंमतीत वाढ होऊन वाहतूक खर्चात देखील वाढ होईल तसंच अन्नधान्याच्या किंमतीही वाढतील असं मूडीजनं आपल्या अहवालात म्हटलं आहे. भारताच्या एकूण कच्च्या तेलाच्या आयातीपैकी ५५ टक्के आणि ९० टक्के एलपीजीची आयात पश्चिम आशियातून केली जाते.

<><><><><>

पश्चिम आशियातला संघर्ष, कच्च्या तेलाच्या वाढत्या किंमती आणि रुपयाच्या मूल्यामध्ये सातत्यानं होणारी घसरण यामुळे परदेशी गुंतवणूकदारांनी एप्रिल महिन्याच्या पहिल्या दोन दिवसातच भारतीय शेअरबाजारातून १९ हजार ८३७ कोटी रुपये काढून घेतले आहेत. मार्च महिन्यात परदेशी गुंतवणूकदारांनी आतापर्यंतचे सर्वाधिक म्हणजे सुमारे एक लाख १७ हजार कोटी रुपये काढून घेतले होते. त्याआधीच्या  फेब्रुवारी महिन्यात मात्र २२

हजार ६१५ कोटी रुपयांची १७ महिन्यांमधली सर्वोच्च गुंतवणूक झाली होती. अमेरिका - इराण युद्ध सुरू झाल्यापासून रुपयाचं मूल्य सुमारे ४ टक्क्यांनी घसरलं आहे, ते आणखी घसरेल या भीतीमुळे परदेशी गुंतवणूकदार समभागांच्या विक्रीवर भर देत आहेत.

**<><><><><>**

जगभरात आज ईस्टरचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. वेटिकन सिटीमध्ये पोप लिओ चौदावे यांनी काल बेसिलिका मध्ये ईस्टर प्रार्थना केल्यानंतर जगभरात ईस्टर सणाला सुरुवात झाली. पोप यांनी जागतिक पातळीवरच्या अशांततेच्या वातावरणात शांततेसाठी आणि बंधुत्वासाठी प्रार्थना केली. अमेरिका इस्त्रायल आणि रशिया युक्रेन यांच्यातल्या संघर्षाचा आपल्या भाषणात उल्लेख करत त्यांनी जगात शांतता नांदावी अशी प्रार्थनाही या निमित्तानं केली. येशू ख्रिस्ताला सुळावर चढवल्यानंतर त्यांचे याच दिवशी पुनरुज्जीवन झाल्याच्या आनंदा प्रित्यर्थ हा सण साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा दिवस सत्य, त्याग आणि प्रेमाचा संदेश देणारा आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी लाधाकृष्णन यांनीही ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ख्रिस्ती धर्मियांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण प्रत्येकाच्या जीवनात आनंद, उत्साह आणि आशा निर्माण करो असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पुदुच्चेरी, आसाम आणि केरळ विधानसभेसाठी येत्या ९ एप्रिलला मतदान होणार आहे. ऐकूया याविषयी एक वृत्तांत…

*(पुदुच्चेरी आणि ४ राज्यातल्या निवडणुकांसाठी प्रचार शिगेला पोहोचला आहे. पहिल्या टप्प्यात आसाम, केरळ आणि पुदुच्चेरी इथं येत्या गुरुवारी ९ एप्रिलला मतदान होणार असून त्या दृष्टीनं सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराचा धडाका लावला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल तिरुवल्ला इथं प्रचारसभा घेतली. महिला सबलीकरण हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं मुख्य ध्येय असून सरकारच्या अनेक धोरणांमुळे महिलांचा मोठ्या प्रमाणात फायदा झाला आहे, असं ते यावेळी म्हणाले. काँग्रेस नेते राहुल*

*गांधी यांनी अलपुळ्ळा, इदुक्की आणि एर्नाकुलम इथं सभा घेतल्या. यावेळी त्यांनी एलडीएफ आणि रालोआवर टीका केली.*

*मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस एम ए बेबी आणि सुभाषिणी अली यांनीही डाव्या आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध मतदारसंघात सभा घेतली.*

*केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केरळात बैपोर मतदारसंघात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचार केला.*

*गोव्यातल्या पोंडा, कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण तसंच नागालँडमधल्या कोरिडांग आणि त्रिपुरातल्या धर्मनगर विधानसभा मतदारसंघातही येत्या ९ एप्रिलला पोटनिवडणुकीसाठी मतदान होणार आहे.*

*या सर्व मतदारसंघात मिळून १ हजार ९५५ उमेदवार रिंगणात आहेत.)*

**<><><><><>**

बँकॉक इथं सुरु असलेल्या पॅरा जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारताची दिव्यांग तिरंदाज पायल नाग हिनं भारताच्याच दिव्यांग तिरंदाज शितल देवी हिचा पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. **या स्पर्धेच्या माध्यमातून भारतीय तिरंदाजांचं श्रेष्ठत्व पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे.** भारताला सर्वाधिक ७ सुवर्ण पदक मिळाली आहेत. १८ वर्षांच्या पायल नाग हिनं महिलांच्या अंतिम सामन्यात १३९ विरुद्ध १३६ गुणांनी विजय मिळवला. या स्पर्धेत भारतीय तिरंदाजांनी १६ पदकं मिळवली असून त्यात पाच रौप्य, चार कांस्य आणि ७ सुवर्ण पदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात आजचा पहिला सामना होईल. हैदराबाद इथे राजीव गांधी मैदानावर दुपारी साडे तीन वाजता सामन्याला सुरुवात होईल. आजचा दुसरा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होणार आहे. बेंगळुरू इथे एम. चिन्नास्वामी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><>**

पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे उत्तर भारतात सर्वत्र पावसाळी हवामान अनुभवायला मिळत असून हिमाचल प्रदेश आणि जम्मू-कश्मीरच्या उंच भागात नव्यानं हिमवर्षावाची नोंद

होत आहे. दिल्ली, पंजाब, हरयाणा आणि राजस्थानमध्ये पाऊस आणि गारपीट होत असल्यानं गहू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. जम्मू-कश्मीरमध्ये हिमवर्षावामुळे अनेक महत्त्वाच्या जिल्हांतर्गत रस्त्यांवरची वाहतूक बंद करण्यात आली आहे. भूमध्य सागरी प्रदेशातून वाहणाऱ्या पश्चिमी वाऱ्यांच्या प्रवाहामुळे ही स्थिती निर्माण झाली असून, येत्या काही दिवसांत राजस्थानमध्ये याचा सर्वाधिक प्रभाव जाणवेल, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. हिमाचल प्रदेशात देखील तापमानात घट झाली असून अनेक जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस आणि हिमवर्षाव होत आहे. येत्या दोन दिवसांत चंबा, कांगडा, कुल्लू, मंडी आणि शिमला इथं वादळ, गारपीट, मेघगर्जना आणि जोरदार वारा वाहण्याची शक्यता असल्यानं हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

//<><><><><>//